ग्रामसेवक RR

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २७ नोव्हेंबर १९७८ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परिशिष्ट आठ—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (कार्यकारी आणि ग्राम विस्तार) तृतीय श्रेणी. | ग्रामविकास अधिकारी | [1][(१) नियुक्ती पुढीलपैकी कोणत्याही प्रकारे करण्यात येईल—<br>(अ) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम कार्यकारी व ग्रामविस्तार) श्रेणी एकमध्ये असलेल्या व ज्यांनी त्या पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केली आहे अशा सुयोग्य ग्रामसेवकांना पदोन्नती देऊन]; किंवा<br>(ब) ज्यांनी ग्रामसेवकांच्या पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतका काळ अखंड सेवा केली असेल अशा व्यक्तींमधून संबंधित विभागीय आयुक्ताद्वारे घेण्यात येणाऱ्या व त्या प्रयोजनार्थ शासनाने विहित केलेल्या मर्यादित स्पर्धात्मक परीक्षेच्या आधारे निवड करून.<br>(२) पदोन्नतीद्वारे व निवडीद्वारे करावयाच्या नियुक्तींचे गुणोत्तर ७५:२५ असे असेल :<br>परंतु ग्रामसेवक व कृषि सहायक (समन्वित ग्रामसेवक) यांच्यामधून पदोन्नतीद्वारे करावयाच्या नियुक्तीचे गुणोत्तर २:१ असे असेल.<br>(३) पदोन्नतीद्वारे किंवा निवडीद्वारे नियुक्त करण्यात आलेले उमेदवार शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल असे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करतील, यांबाबतीत कसूर झाल्यास, अशी नियुक्ती होण्याच्या लगतपूर्वी त्यांनी जी पदे धारण केली असतील त्या पदांवर त्यांना पदावनत करण्यात येईल. यासोबत जोडलेल्या नमुना 'ई' मध्ये त्यांनी कराराची बंधपत्रे करून देणे आवश्यक असेल.] |

[1] शासकिय अधिसूचना, दिनांक २६ ऑगस्ट १९९० अन्वये मूळ मजकूर ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परिशिष्ट आठ—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम कार्यकारी आणि ग्राम विस्तार) प्रथम श्रेणी. | ग्रामसेवक | [1][जे उमेदवार—<br>(१) (एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय २८ वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता आणि कृषि विषयाची पदविका दोन वर्षांचा अभ्यासक्रम धारण करीत असतील अशा उमेदवारां-मधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. मात्र कृषि विषयाची पदवी किंवा उच्च अर्हता धारण करणाऱ्या किंवा समाजसेवेचा अनुभव आणि ग्रामीण अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल.<br>(२) परिच्छेद (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळ (विचारविनिमयापासून सूट) नियम, १९७६ मधील खंड (एक) च्या उप खंड (एक) अन्वये जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहायक ग्रामसेवक पदावर दिनांक १५ नोव्हेंबर १९७६ पासून दिनांक ३१ ऑक्टोबर १९७८ पर्यंतच्या कालावधीत नियुक्त केलेल्या व्यक्तींचासुद्धा, ग्रामसेवक या पदावर नियुक्तीसाठी विचार केला जाईल :<br>परंतु—<br>(अ) त्या व्यक्तीची सहायक ग्रामसेवकाच्या पदावरील प्रथम नियुक्ती, त्यावेळी अंमलात असलेल्या सेवा प्रवेश नियमांतील तरतुदींनुसार आलेली असणे आणि |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १७ फेब्रुवारी १९८४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हा परिषद पालघर

CamScanner

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३—चालू | | | (२) मागासवर्गीय उमेदवार व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील उमेदवार यांच्यासाठी राखीव पदे ठेवून नियुक्ती झालेली असणे आवश्यक आहे. |
| | | | (३) मागनिर्देशनाद्वारे नियुक्ती केलेल्या उमेदवारांना शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेले पाठ्यक्रम प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास सेवेतून मुक्त करण्यास ते पात्र ठरतील. यांना जोडलेला नमुना "ड" मध्ये त्यांनी करारनामा करणे आवश्यक आहे. |

[ * * * * ]



[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १७ फेब्रुवारी, १९८४ अन्वये वगळण्यात आले.



## नमुना "ड"

[1][ (परिशिष्ट आठ, नियम २ व ३ पहा) ]

हा करारनामा दिनांक .......... एकोणीसशे ..... रोजी एका पक्षी .......... जिल्हा परिषद जिचा (यापुढे यात 'जिल्हा परिषद' म्हणून उल्लेख केला आहे) आणि दुसऱ्या पक्षी राहणारे श्री. .............................. येथील राहणारे ज्यांचा (यात यापुढे 'प्रशिक्षार्थी' म्हणून उल्लेख केला आहे) यांच्यात करण्यात आला आहे.

ज्याअर्थी, प्रशिक्षार्थीची जिल्हा परिषदेकडून .......... येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये सहायक ग्रामसेवक यांच्या पाठ्यक्रमासाठी दरमहा ....... रुपये एकत्रित पाठ्यवेतन अधिक त्याला अनुज्ञेय असलेले वेतन व भत्ते इतक्या वेतनावर निवड झालेली आहे, आणि ज्याअर्थी प्रशिक्षार्थीने त्याची निवड झाल्यामुळे, यापुढे दिलेल्या अटींवर व शर्तींवर सहायक ग्रामसेवक/ग्रामसेवक म्हणून प्रशिक्षण पाठ्यक्रमाचे प्रशिक्षण पूर्ण करण्याचे मान्य केले आहे.

म्हणून आता, त्यांची निवड झालेली असल्यामुळे आणि त्यास वर निर्देशित केलेले एकत्रित पाठ्यवेतन, त्याचे वेतन आणि भत्ते एवढे वेतन घावयाचे असल्याने प्रशिक्षार्थी, याद्वारे पुढील गोष्टी मान्य करीत असून, हा करारनामा पुढील गोष्टींना साक्षीदाखल करण्यात येत आहे:—

(१) प्रशिक्षार्थी सहाय्यक, ग्रामसेवकाच्या/ग्रामसेवकाच्या/ग्रामविकास अधिकाऱ्याच्या उपरोक्त प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणाचा पाठ्यक्रम जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा याबाबतीत त्यांच्याकडून नामनिर्देशित करण्यात येईल असा अधिकारी यांचे समाधान होईल अशा रीतीने सायासाने करण्याचे, आणि उपरोक्त केंद्रातील प्रशिक्षार्थींच्या वर्तणुकीचे विनियमन करणाऱ्या, वेळोवेळी, अंमलात असलेल्या नियमांचे पालन करील व प्रशिक्षणाचा पाठ्यक्रम पु[illegible] विहित परीक्षेत आणि चाचणीत बसेल.

(२) प्रशिक्षणार्थी त्याचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर आणि विहित परीक्षा आणि चाचण्या उत्तीर्ण झाल्यानंतर जिल्हापरिषदेत सहायक ग्रामसेवक/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी म्हणू[न] अथवा तुल्य पदावर किमान पाच वर्षे काम करील.

(३) वरील खंड (२) मधील उपबंधास अधीन राहून, प्रशिक्षार्थी आपल्या कर्तव्या[चे] प्रामाणिकपणे, सायासाने, कौशल्याने आणि समर्पणे पार पाडील आणि जिल्हा परिषदे[च्या] कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीचे नियमन करणाऱ्या वेळोवेळी अंमलात असलेल्या, नियमांचे पालन करील.

(४) विहित परीक्षा आणि चाचण्या उत्तीर्ण होण्यापूर्वी, जिल्हा परिषदेची लेखी परवान[गी] घेतल्या खेरीज आजारपण धरून इतर कोणत्याही कारणांमुळे प्रशिक्षार्थीने उपरोक्त प्रशि[क्षण] केंद्र सोडले असेल अथवा प्रशिक्षार्थीने उपरोक्त प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षार्थींच्या वर्तणुकीचे नियम[न] करणाऱ्या, वेळोवेळी अस्तित्वात असलेल्या नियमांचे पालन न केल्यामुळे प्राधान्याने त्यास काढू[न] टाकले असेल अथवा विहित परीक्षा व विहित चाचण्या विहित केलेल्या कालावधीत उत्ती[र्ण] होण्यास तो असमर्थ ठरला असेल अथवा प्रशिक्षण पाठ्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर त्[याने] सहायक ग्रामसेवक/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी म्हणून नोकरी करण्यास नकार दिला असे[ल] अथवा सहायक ग्रामसेवक/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी ही पदे स्वीकारल्यानंतर कि[मान] पाच वर्षे नोकरी करण्यास त्याने नकार दिला असेल अथवा पाच वर्षांच्या कालावधीत त्[याने] राजीनामा दिला असेल अथवा त्यास बडतर्फ करण्यात आले असेल तर त्याने जिल्हा परि[षदेला] पाठ्यवेतनाची एकूण रक्कम आणि वेतन व भत्ते व प्रशिक्षणाच्या कालावधीतील प्रशिक्षण [illegible] म्हणून शासनाने त्यास दिलेल्या एकूण पाठ्यवेतनाच्या ५० टक्के रक्कम परत केली पा[हिजे] आणि ती रक्कम त्याच्याकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल.

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १६ ऑगस्ट १९९० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दा[खल करण्यात आला.]

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हा परिषद पालघर

CamScanner
CamScanner

RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार – ब

वर्ष २, अंक ७०]   गुरुवार, ऑगस्ट २५, २०११/भाद्र ३, शके १९३३   [पृष्ठे ४

किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक १३१

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ ऑगस्ट २०११

## अधिसूचना

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१.

क्रमांक सेप्रनि.-२०११/सं.क्र.२६०/आस्था-१०.— महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. पाच) कलम २७४, पोट-कलम (२) खंड ( एकोणचाळीस) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाला समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम २७४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहेत.—

१.   या नियमांना, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) (सुधारणा) नियम, २०११ असे संबोधण्यात येईल.



उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हा परिषद पालघर

CamScanner

CamScanner

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम, १९६७ मधील परिशिष्ट-आठ मधील अ.क्र. ३ येथील नोंद जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (दुय्यम ग्रामसेवक कार्यकारी आणि विस्तार), प्रथम श्रेणी आणि स्तंभ-३ मधील ग्रामसेवक पदासमोरील स्तंभ-४ मधील परिच्छेद-१ ऐवजी खालीलप्रमाणे मजकूर समाविष्ट करण्यात येईल, जसे:—

(१) नियुक्ती ही पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारे करण्यात येईल.—

(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसलेले जे उमेदवार ३३ वर्षापेक्षा अधिक वयाचे नसतील ; आणि

(दोन) उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता परीक्षा किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण ;

किंवा

शासनमान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षांचा अभ्यासक्रम) ;

किंवा

शासनमान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (बी.एस.डब्ल्यू.) आणि,

(तीन) संगणक हाताळणी/वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रकाश हिर्लेकर,
शासनाचे सह सचिव.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हा परिषद पालघर

CamScanner